ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal**



**VOLUME - I ISSUE - III**
**OCT. TO DEC. 2020**

ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT | LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

PRINCIPAL
SAVITRIBAI COLLEGE OF ARTS
Pimpalgaon Pisa, Tal.Shrigonda,
Dist.Ahmednagar

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Editor
Professor Dr.Sadashiv H. Sarkate

| | | | |
|---|---|---|---|
| 19 | Malalaandthe Politics of Literary Controversy | Kailas B. Giri | 89-91 |
| 20 | D.D. Kosambi Contribution to Marxist Historiography | Vasappa Sottammanavar | 92-95 |
| 21 | Decentralization and Women Empowerment in India | Dr. Shivaji Ramachandra Katti | 96-99 |
| 22 | A Study On The Role Of Public Private Partnership Towards Corporate Social Responsibility In India | Mohan V. T.<br>Dr. B. P. Shivalingappa | 100-107 |
| 23 | Application of Teaching and Learning Strategies for students with learning disability | Dr.Atul B Pawar<br>Mrs. Poonam Jagdish Varma | 108-118 |
| 24 | स्तंभलेखन : एक आकलन | प्रा.विठ्ठल संपतराव जाधव<br>प्रा.डॉ.सुरेश वि. जाधव | 119-123 |
| 25 | मराठी आदिवासी कविता | प्रा.डॉ. बडुरे राजू सायन्ना | 124-129 |
| 26 | बहिणाबाईंची गाणी अस्सल देशीकार लेणी | प्रा. प्रल्हाद दत्तराव भोपे | 130-133 |
| 27 | आदिवासींची जीवनमूल्ये (आदिवासी कादंबरीच्या संदर्भात) | डॉ.सुलतान पिरू पवार | 134-139 |
| 28 | नवदोत्तर आदिवासी कादंबरीचे आकलन | अनिल मोतीलाल वळवी | 140-145 |
| 29 | 'सांगावा' मधील अभिव्यक्तिनिष्ठ शैली : एक अभ्यास | प्रा. डॉ. व्यंकट दिगंबरराव कोरेबोईनवाड | 146-148 |
| 30 | महानुभावांचा तुरा पक्ष | डॉ. हंसराज जाधव | 149-156 |
| 31 | काशिबाई कानिटकरलिखित डॉ.आंनदीबाई जोशी ह्यांच्या चरित्राचा थोडक्यात शैलीवैज्ञानिक अभ्यास | उज्ज्वला रोहमारे | 157-164 |
| 32 | काया मातीत मातीत काव्यसंग्रहातील धगधगते सामाजिक जीवन | प्रा.डॉ.सोपान माणिकराव सुरवसे | 165-169 |
| 33 | जीवन पद्धतीचा चिंतन गर्भ आविष्कार: बहिणाबाईची गाणी | प्रा. रमेश रिंगणे | 170-173 |
| 34 | बाबा आमटे यांच्या 'करुणेचा कलाम' कवितासंग्रहातील जीवन जाणिवा | प्रा. डॉ. नारायण शिवशेट्टे | 174-177 |
| 35 | शब्दव्रती : शांता शेळके | प्रा.डॉ.प्रियदर्शनी वसंतराव देशमुख | 178-181 |
| 36 | माझ्या वर्तमानाची नोंद जागतिकीकरणाच्या संदर्भात' | प्रा.डॉ.प्रेमला मुखेडकर | 182-185 |
| 37 | बोंबदवंडी आत्मकथनाचे वाङ्मयीन मूल्यमापन | प्रा. लालबा चां. दुमटकर | 186-189 |
| 38 | संत साहित्याचे सामाजिक योगदान | प्रा.डॉ.डी.एम.शेटे | 190-193 |
| 39 | संत साहित्यातील अस्पृश्यता निर्मूलन विचार | डॉ.अनिल व्यंकटराव मुंढे | 194-197 |
| 40 | क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | प्रा.समीर रामचंद वैरागी | 198-201 |


Savitribai College of Arts ID. No. PU/AN/A/58/1999 Pimpalgaon Pisa Dist. Ahmednagar

PRINCIPAL
**Savitribai College of Arts**
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

# संत साहित्याचे सामाजिक योगदान

प्रा.डॉ.डी.एम.शेटे

सावित्रीबाई कला महाविद्यालय, पिंपळगांव पिसा, ता.श्रीगोंदा

प्रास्ताविक

यादव राजवटीमध्ये समाज व्रतवैकल्ये, कर्मकांड या मार्गात गुंतला होता. समाजाला कोणतीही दिशा राहिली नव्हती.अशावेळी समाजाला दिशा देण्याचे काम संत साहित्याने केले. त्या काळातील सर्व समाज अंधश्रद्धा, दांभिकता, धर्मभोळेपणा यासारख्या खुळ्या कल्पनांमध्ये गुंतलेला असतानाया समाजाला भक्तीच्या मार्गाने 'सत्या'पर्यंत पोहोचविण्याचे काम संतांनी केले.

शके १२०००मध्ये संत ज्ञानदेवांनी भागवत धर्माचा पाया घातला त्याचा विस्तार नामदेवांनी केला संत ज्ञानदेव,नामदेव यांनी भागवत धर्माचा झेंडा हाती घेऊन सर्व जाती धर्मातील लोकांना एकत्र आणून प्रबोधन घडवून आणले.धर्माविषयीचे खरे आचार-विचार समाजाला सांगण्याचे काम संत नामदेव,ज्ञानदेव यांच्या प्रभावळीतील संतांनी केले. भक्ती, नामस्मरण हेच खरे सुखाचे साधन आहे. यापेक्षा वेगळा मार्ग स्वीकारण्याची गरज नाही. भक्ती करण्याचा अधिकार गरीब,श्रीमंत,उच्च,नीच शूद्र,स्त्रीया सर्वांना आहे.यामध्ये कोणताही भेदभाव नाही.चातुर्वर्ण्य व्यवस्थेने ज्या बहुजन समाजाची भक्तीची दारे बंद केली होती,त्या बहुजन समाजाला भक्तीची दारे संतांनी उघडी करून दिली. यामधून एक प्रकारे सर्व समाजामध्ये भागवत धर्माच्या माध्यमातून समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला गेला.संत साहित्यातसंत तुकारामांनी आपल्या भक्तीचा आपल्या अभंगवाणीचा वेगळा ठसा उमटविला म्हणूनआज सर्वसामान्य लोकांच्या मुखामध्ये संत तुकाराम महाराजांची अभंग वाणी मुखोद्गत आहे.

सामाजिक विषमतेने व्यथित झालेल्या समाजाचे चित्रण प्रथम संत ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी मधून मांडले.संत एकनाथांच्या रूपात त्यांचा प्रतिध्वनी उमटला आणि तुकोबारायांच्या रूपात सामाजिक विकृतींना फटका देत मानवी मनात आणि समाजजीवनात आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम संत साहित्याने केले.

संतांची भूमिका ही केवळ तत्वचिंतनाची नव्हती तर लोकशिक्षकाची होती यात शंका नाही. सामाजिक आणि अध्यात्मिक जनजागृती करणे हेच संतांचे खरे ध्येय होते. समाज उद्धाराची तळमळ त्यांच्या रचनांमधून सर्व ठिकाणी जाणवते. संत तुकाराम महाराज समाजाची वाईट अवस्था पाहून

"बुडते हे जन न देखवे डोळा"

"येतो कळवळा म्हणवोनि "

असे संत तुकाराम महाराज म्हणतात.म्हणजेच जनजागृती घडवून आणणे हेच संतांचे खरे कार्य होते.संत हे श्रेष्ठ प्रबोधनकार होते म्हणून कधी विनंती करून, तर कधी भीती दाखवून,तर कधी रागावून,ते



Savitribai College of Arts
ID. No. PU/AN/A/ 58/1999
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

समाजाला जागे करीत होते. संत साहित्यात वारकरी संप्रदाय हा एक असा संप्रदाय आहे,की ज्या संप्रदायामध्ये सर्व जाती धर्माच्या लोकांना तसेच स्त्री, शुद्र यांना सुद्धा सामावून घेणारा संप्रदाय म्हणून ओळखला जातो.अध्यात्म बरोबर समाज प्रबोधन घडून आणण्यासाठी त्यांनी किर्तन,भजन, भारुड यासारख्या लोककलांचा वापर करून लोकांच्या समस्या लोककलेतून लोकांसमोर मांडण्याचे महत्वाचे काम संत एकनाथ सारख्या लोक शिक्षकांनी केले आहे.

"अवघाची संसार सुखाचा करीन। आनंदेभरीन तिन्ही लोक"

असा विश्वास ज्ञानदेवांनी समाजाला दिला आणि अनेक जाती-धर्माचे संत ज्ञानदेवांना भोवती जमा झाले.नामदेवा नंतर संत नामदेव यांनी "नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी"असे म्हणत मराठीचा प्रचार आणि प्रसार थेट पंजाबपर्यंत पोहोचवला. कीर्तनाच्या रंगात नाचून ज्ञानाची ज्योत सामान्य माणसात लावू असे ठामपणे संत नामदेव सांगतात.यानंतर संत गोरा कुंभार यांनी आपल्या अभंगांमधून विठ्ठल भक्तीचे महात्म्य तसेच यश हे सहजासहजी प्राप्त होत नाही त्यासाठी मनापासून प्रयत्न करावे लागतात.संत गोरोबांनी अगदी साध्या शब्दात अभंग रचना करून आपले ज्ञान व अनुभव त्यामधून मांडले आहेत.संत सावता माळी यांचे संपूर्ण जीवनच विठ्ठलमय झाले होते.त्यांनी समाजाला एक नवा आदर्श घालून दिला.तो म्हणजे कामातच राम आहे. "आमची माळीयाची जात।शेत लावू बागाईत। आम्हा हाती मोट नाडा। पाणी जाते फुलझाडा" अशा प्रकारे त्यांनी आपल्या जातीविषयी आणि कामाविषयी समाधान व्यक्त केले आहे. संत सावतामाळी तत्कालीन सामाजिक व धार्मिक विषमतेचे बोलके उदाहरण होते.

**संत नरहरीसोनार**

हे सुरुवातीला कट्टर शैवपंथी होते. नंतर नामदेवांच्या सहवासात आल्यानंतर त्यांनी जी अभंग रचना निर्माण केली त्यामधून समाज प्रबोधनाचे महत्त्वाचे काम केले.

**संत चोखामेळा**

हे मूळचे मंगळवेढ्याचे राहणारे होते त्यांनी अनेक तीर्थयात्रा केल्या नंतर ते पंढरपूर येथे आले व नामदेवांच्या कीर्तनाने हरिनामाशी एकजीव झाले. त्यांनी आपल्या अभंगांमधूनसमतेचा संदेश दिला आहे.ते म्हणतात "टाळी वाजवावी गुढी उभारावी! वाट ही चालावी पंढरीची"

ते पंढरीला समतेचे अधिष्ठान मानतात.म्हणूनच ते दलितांची सामाजिक दुःखे आपल्या अभंगातून प्रकट करतात "ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा। काय भुललासी वरलिया रंगा" अशा अभंगांमधून ते आपले परखड मत समाजापुढे मांडतात.

**संतसेना न्हावी**

हे मूळचे जबलपूरचे परंतु तीर्थयात्रा करीत महाराष्ट्रात आले आणि पंढरीस येऊन ते वैष्णवमय झाले.त्यांनी आपल्या अभंग रचनेत पंढरीचे महात्म्य तसेच "मानिसी देहाचा भरवसा! केव्हा जाईल नकळे कैसा" यासारख्या रचनांमधून समाज प्रबोधन केले आहे. संत विसोबा खेचर यांचे सकल संतगाथेमध्ये दोनच अभंग सापडतात. ते आपल्या एका अभंगात म्हणतात "काळ अनुकूल अथवा प्रतिकूल। परी सोडू



Savitribai College of Arts ID. No. PU/AN/A/ 58/1999 Pimpalgaon Pisa, Dist. Ahmednagar
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

नये आपले धैर्य बळ" यामधून समाजाला त्यांनीउपदेश केला आहे. नामदेवांचे ते गुरु होते व ज्ञानदेवांचे ते शिष्य होते.

**संत मुक्ताबाई**

यांचा अधिकार संत साहित्यामध्ये खूप मोठा आहे."मुंगी उडाली आकाशी। तिने गिळले सुर्याशी" तसेच "ताटी उघडा ज्ञानेश्वरा" यासारख्या अभंगांमधून समाज प्रबोधनाचे महत्वाचे काम केले आहे.

**संत जनाबाई**

यांना 'संत वाटिकेतील जाईचा वेल' असे म्हटले जाते त्यांनी 'विठो माझा लेकुरवाळा। संगे गोपाळांचा मेळा' या अभंगांमधून संपूर्ण भक्त मेळ्याचे वर्णन केले आहे. तसेच स्त्री सुलभ भावना, स्त्रियांची दुःखे यांना वाचा फोडण्याचे काम केले आहे.

**संत कान्होपात्रा**

या भागवत संप्रदायातील एक कवयित्री आहेत. मंगळवेढा येथील एका गणिकेची ती कन्या होती. त्यामुळे तिच्या वाट्याला आलेले दुःख तिने अभंगांमधून मांडले आहे. "मज अधिकार नाही। भेटी देई विठाबाई" यासारख्या अभंग रचना त्यांनी केल्या आहेत. यामधून सामाजिक दुःख प्रकट झाल्याचे दिसते.

**संत एकनाथ**

संत एकनाथ यांचा जन्म पैठण येथे झाला.वारकरी संप्रदायाची परंपरा संत एकनाथांच्या घरात होती.त्यामुळे संत एकनाथ हे तात्काळ वैष्णवमय झाले.संत एकनाथ हे खरे लोकशिक्षण कार होते. आजही संत एकनाथांच्या भारुडांची आवश्यकता आहेत.त्यांचे एक भारुड म्हणजे एक उपदेशच आहे.'विंचु चावला विंचु चावला', 'सत्वर पाव ग मला भवानी आई रोडगा वाहीन तुला' यासारख्या भारुडा मधून संत एकनाथांनी समाज प्रबोधनाचे महत्त्वाचे काम केले आहे.

**संत शेख महंमद**

यांना हिंदू-मुस्लिम यांच्यातील सलोखा साधणारे संत म्हणून ओळखले जाते 'योगसंग्राम'हा त्यांचा प्रमुख ग्रंथ आहे.श्रीगोंदा तालुक्यामध्ये आजही शेख महाराज यांची परंपरा टिकून आहे.हिंदू व मुस्लिमएकत्र येऊन शेख मोहम्मद महाराज यांचा उत्सव ते आनंदाने साजरा करतात.हे या ठिकाणचे विशेष आहे.

**संत बहेणाबाई**

संत साहित्यात संत बहिणाबाईचे स्थान अत्यंत महत्वाचा आहे.वारकरी संप्रदायाची परंपरा सांगताना.'संत कृपा झाली। इमारत फळा आली' या अभंगाचा उल्लेख केल्याशिवाय पुढे जाताच येत नाही. यामधून त्यांनी वारकरी संप्रदायाचा संपूर्ण इतिहास सांगितला आहे.तसेच त्यांनी आपल्या अनेक अभंगांमधून स्त्रियांविषयक दुःखाचे अनेक प्रकार सांगितले आहेत.

**संत निळोबाराय**

संत निळोबाराय हे वारकरी संप्रदायातील शेवटचे संत होय. संत निळोबाराय हे संत तुकाराम महाराजांचे शिष्य होते.यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील पिंपळनेर येथे झाला. संत तुकाराम



Savitribai College of Arts ID. No. PU/AN/A/ 58/1999 Pimpalgaon Ahmednagar
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

महाराजांनंतर वारकरी संप्रदायाचे धुरा त्यांनी आपल्या खांद्यावर घेतली व पुढे चालवली.यांनी 'चांगदेव-ज्ञानेश्वर चरित्र' लिहिणे व संत तुकारामांच्या जीवनावर अनेक अभंग लिहिले.

मराठी साहित्यात संत साहित्याला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. चारशे ते पाचशे वर्षांपूर्वी संत ज्ञानदेवांनी वारकरी संप्रदायाची स्थापना करून, पंढरपूरचा विठ्ठल याला आराध्य दैवत मानून पंढरपूरची वारी सुरु केली. या वारकरी संप्रदायात अनेक जातीधर्मांच्या लोकांना संत ज्ञानदेव व नामदेव यांनी एकत्र आणले. स्त्रियांनासुद्धा या संप्रदायात आदराचे स्थान मिळाले. आणि म्हणूनच ज्ञानदेव- नामदेवांच्या प्रभावळीत खूप मोठा संत समुदाय तयार होऊन त्यांनी अभंग रचना केली. त्याअभंगांमधून समाज प्रबोधनाचे महत्त्वाचे काम संतांनी केले. संतांनी समाजामध्ये परिवर्तन घडविण्यासाठी किर्तन, भजन, भारुड, गोंधळ, लोकगीत यासारख्या लोकलांमधून अध्यात्म सांगितले.भक्तीचा आधार घेऊन परमेश्वर प्राप्ती कडे जाण्याचा मार्ग सांगितला. परमेश्वरावरील निस्सीम भक्ती हे जीवनाचे सार्थक होय. हे तत्वज्ञान संतांनी तळागाळातल्या माणसापर्यंत पोहोचवण्याचे कामकेले.हा एक समतेचा विचार संतांनी समाजाला दिला.म्हणूनच आज साहित्यामध्ये संत साहित्य श्रेष्ठ ठरते.

**संदर्भग्रंथ**

१] गं.बा.सरदार संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती लोकवांङमय गृह मुंबई.
२] संत तुकाराम अभंग गाथा गव्हर्मेंट सेंट्रल प्रेस 1955 पुनर्मुद्रण
३]नसिराबादकर,प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास,फडके प्रकाशन कोल्हापूर.
४]सकल संतवाणी गीता प्रेस गोरखपुर,खंड पहिला.
५]डॉ.आरती दातार,महाराष्ट्रातील संत परंपरा,डायमंड पब्लिकेशन पुणे.

Savitribai College of Arts ★ Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar ★ ID. No. PU/AN/A/ 58/1999

◆◆◆

PRINCIPAL
SAVITRIBAI COLLEGE OF ARTS
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda
Dist. Ahmednagar